महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक – ०४ जुलै, २०२४

## - : प्रसिद्धीपत्रक : -

**विषय :-** दिनांक ०१ ते ०३ जुलै, २०२४ दरम्यान नियोजित करण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या मराठी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजनाच्या सुधारित दिनांकाबाबत ( जाहिरात क्रमांक १११/२०२३)

**संदर्भ:-** आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०१ जुलै,२०२४ रोजीचे प्रसिद्धीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा- २०२३ मधील लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाकरीता TCS या सेवा पुरवठादार संस्थेमार्फत दिनांक ०१ जुलै, २०२४ ते १३ जुलै, २०२४ रोजी टंकलेखन कौशल्य चाचणी आयोजित करण्यात आली आहे. तथापि दिनांक ०१ जुलै, २०२४ रोजी प्रथम सत्राकरिता उपस्थित उमेदवारांना टंकलेखन कौशल्य चाचणीदरम्यान काही तांत्रिक अडचणी उद्धवल्यामुळे टंकलेखन कौशल्य चाचणी पुर्ण होऊ न शकल्याने दिनांक ०१ जुलै, २०२४ ते ०३ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली टंकलेखन कौशल्य चाचणी पुढे ढकलण्याचा निर्णय आयोगाने घेतला होता. दिनांक ०१ जुलै, २०२४ ते ०३ जुलै, २०२४ रोजी टंकलेखन कौशल्य चाचणी असलेल्या सर्व उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणी खालीलप्रमाणे नमूद केलेल्या ठिकाणी, दिनांक व वेळेस आयोजित करण्यात येईल :-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | टंकलेखन भाषा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | १११/२०२३ | लिपिक टंकलेखक (मराठी) आणि कर सहायक (मराठी) | मुंबई | १० जुलै, २०२४ | सकाळी ०९:०० ते १०:००, सकाळी ११:३० ते १२:३०, दुपारी ०२:०० ते ०३:०० आणि दुपारी ०४:३० ते ०५:३० |
| २ | १११/२०२३ | लिपिक टंकलेखक (मराठी) आणि कर सहायक (मराठी) | मुंबई | ११ जुलै, २०२४ | सकाळी ०९:०० ते १०:००, सकाळी ११:३० ते १२:३०, दुपारी ०२:०० ते ०३:०० आणि दुपारी ०४:३० ते ०५:३० |
| ३ | १११/२०२३ | लिपिक टंकलेखक (मराठी) आणि कर सहायक (मराठी) | मुंबई | १२ जुलै, २०२४ | सकाळी ०९:०० ते १०:००, सकाळी ११:३० ते १२:३०, दुपारी ०२:०० ते ०३:०० आणि दुपारी ०४:३० ते ०५:३० |
| ४ | १११/२०२३ | लिपिक टंकलेखक (मराठी) आणि कर सहायक (मराठी) | मुंबई | १३ जुलै, २०२४ | सकाळी ०९:०० ते १०:००, सकाळी ११:३० ते १२:३०, दुपारी ०२:०० ते ०३:०० |

**२.** टंकलेखन कौशल्य चाचणीच्या ठिकाणाचा तपशील व उमेदवारांना विहित करण्यात आलेली वेळ इत्यादी तपशील प्रवेशप्रमाणपत्राद्वारे अवगत करण्यात येईल. दिनांक १० जुलै, २०२४ ते १३ जुलै, २०२४ या कालावधित सुधारित मराठी टंकलेखन कौशल्य चाचणी असलेल्या उमेदवारांना नव्याने प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील. आयोगाद्वारे नव्याने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या प्रवेश प्रमाणपत्रांच्या आधारे परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

**३.** कर सहायक पदासाठी ज्या उमेदवारांना मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतील टंकलेखन कौशल्य चाचणी देणे आवश्यक आहे अशा उमेदवारांची मराठी व इंग्रजी टंकलेखन कौशल्य चाचणी एकाच सत्रात येणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

**४.** यापुर्वी दिनांक १४ जून,२०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकात नमुद केल्याप्रमाणे दिनाक १० ते १३ जुलै,२०२४ या कालावधित आयोजित लिपिक टंकलेखक (इंग्रजी) आणि कर सहायक (इंग्रजी) टंकलेखन कौशल्य चाचणीच्या वेळापत्रकात कोणताही बदल नाही तसेच दिनांक १४ जून,२०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील इतर अटी व शर्तींमध्ये बदल नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण:- नवी मुंबई

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग